उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषय गृहपाठ अभिवृत्ती आणि गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी कृतीकार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता– एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी)
पदवीकरिता सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

पलमटे तुकाराम शिवदास

मार्गदर्शक

डॉ. सिध्दार्थ सुधाकरराव होवाळ

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै 2021

अनुक्रमणिका

1. प्रस्तावना
2. संशोधनाची गरज व महत्व
3. समस्येचे विधान
4. कार्यात्मक व्याख्या
5. संशोधनाची उदिष्टे
6. गृहीतक
7. व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा
8. परिकल्पना
9. संबंधित संशोधनाचा आढावा
10. संशोधन पद्धती
11. जनसंख्या
12. नमुना
13. माहिती संकलनाची व विश्लेषणाची साधने
14. प्रकरण योजना
15. कालावधी
16. संदर्भ ग्रंथ सुची

1. प्रस्तावना :-

विद्यार्थ्यांचे दृढीकरण होण्यासाठी आवश्यक असणारा महत्वाचा घटक म्हणजे गृहपाठ. वर्गात आत्मसात केलेले ज्ञान लक्षात ठेवण्यासाठी घरी गेल्यानंतर पद्धतशीरपणे अभ्यास करावा लागतो. अलीकडे ज्ञानरचनावादाचा विचार करून स्वाध्याय पुस्तिकाची मागणी होवू लागली आहे. उच्च शिक्षित पालक गृहपाठ ज्ञानरचनावादानुसार असावा असा आगृह धरतो तर अक्षर निरक्षर पालक मात्र पाल्य शिक्षण घेतोय यातच समाधानी असतो. गृहपाठ हे तीन प्रकारचे असतात. 1. सराव होण्यासाठी दिलेले गृहपाठ 2. पूर्व तयारी होण्यासाठी दिलेले गृहपाठ 3. पुढील घटक शिकण्यापूर्वी दिला जाणारा गृहपाठ. गृहपाठाच्या योग्य व्यवस्थापनामुळे विद्ध्यार्थ्याची तयारी होते. पालक व विद्ध्यार्थ्यात सुसंवाद निर्माण होतो त्याचप्रमाणे शिक्षक व विद्ध्यार्थ्यात सुसंवाद निर्माण होतो. घर व शाळा यामध्ये एक दुवा निर्माण होतो, अभ्यासाची सवय लागते. अप्रत्यक्षपणे जीवनाला शिस्त लागते. विद्धयार्थी कोणतेही काम वेळेत पूर्ण होण्याबाबत आग्रही राहतो. व्याक्तीभेदानुसार गृहपाठ दिल्याने अध्ययन अधिक सुकर होते, अध्ययनात प्रगती होते. सर्व शिक्षक मिळून गृहपाठ देण्याचे योग्य नियोजन करतात त्यामुळे रिकाम्या वेळेचा सदुपयोग करण्यास विद्धयार्थी सक्षम बनतो.

निरक्षर पालक गृहपाठ पूर्ण करायला पाल्याला मदत करत नाही. यामुळे विद्यार्थ्यांच्या गृहपाठातील सहभाग कमी अधिक असतो. गृहपाठाकडे अतिरिक्त ताण म्हणून पहिले जाते. गृहपाठामुळे शिक्षणाची आवड कमी होवू शकते कारण विद्यार्थी हा शिक्षकाने दिलेल्या विषयाचाच अभ्यास करावा लागतो त्यामुळे इच्छा असूनही अभ्यास करायला वेळ मिळत नाही. घरी पालक गृहपाठात मदत करतात तेव्हा पालक त्याच्या पाल्याला अध्यापन करतात तेव्हा शिक्षकाचे अध्यापन व पालकाचे अध्यापन यात संभ्रम निर्माण होतो. यातून मनासारख्या विषयाचे अथवा घटकाचा अभ्यास करायला मिळाला नाही की थकवा व कंटाळा निर्माण होतोच. गृहपाठ वेळेत पूर्ण केला नसेल तर शिक्षा होण्याची शक्यता अधिक असते. यातून मग नक्कल करण्याची प्रवृत्ती वाढते. ज्या मित्राने गृहपाठ केला असेल त्याची वही आणून क्षणात आपल्या वहीत उतरून घेतला जावू शकतो. त्यामुळे उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयातील गृहपाठबाबतची अभिवृत्ती अभ्यासणे आणि गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी कृतीकार्यक्रम निर्मिती करणे त्याची परिणामकारकता अभ्यासणे या हेतूने सदर विषय संशोधकाने निवड केली आहे. संशोधक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत सहशिक्षक या पदावर कार्यरत असून गृहपाठबाबत वारंवार समस्या जाणवतात यातूनच प्रस्तुत संशोधन विषय निवडलेला आहे.

2. संशोधनाची गरज व महत्व :-

संशोधनाची गरज –

अ) उच्च प्राथमिक स्तरातील विद्यार्थ्यांमधील मराठी विषय गृहपाठबाबतच्या सद्यस्थितीची माहिती मिळेल.

आ) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना मराठी विषय गृहपाठबाबत प्रवृत्त करता येईल.

इ) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना मराठी विषय गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी कृतीकार्यक्रम तयार करता येईल.

संशोधनाचे महत्व

अ) उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना मराठी विषय गृहपाठबाबतची माहिती समजेल.

आ) गृहपाठाबाबत विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती निर्माण होईल.

इ) स्व प्रयत्नातून. गृहपाठ करेल तेव्हा आत्मविश्वास वाढेल.

ई) उच्च प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमात मराठी विषय गृहपाठासाठी आवश्यक घटकांचा समावेश करता येईल.

3. समस्येचे विधान :-

उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषय गृहपाठ अभिवृत्ती आणि गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी कृतीकार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता- एक अभ्यास

4. कार्यात्मक व्याख्या :-

उच्च प्राथमिक स्तर- लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील मराठी माध्यमाच्या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या इयत्ता सहावी या वर्गाचा समावेश आहे. यास उच्च प्राथमिक स्तर असे म्हटले आहे.

विदयार्थी - प्राथमिक स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील लातूर जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील मराठी माध्यमाच्या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या इयत्ता सहावी या वर्गातील अध्ययनार्थ्यांना विदयार्थी असे म्हटले आहे

गृहपाठ :- विद्ध्यार्थ्यास रिकाम्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी, स्वतःचे अध्ययन स्वतः करण्यासाठीचे कार्य म्हणजे गृहपाठ होय.

5. संशोधनाची उदिष्टे :-

१. उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषय गृहपाठबाबतच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे.

२. उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषय गृहपाठबाबतच्या सहभागाचा अभ्यास करणे.

३. गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी कृतीकार्यक्रमाची निर्मिती करणे.

४. गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी कृतीकार्यक्रम राबविणे.

५. उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी कृतीकार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे.

6. गृहीतक :-

१. उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी कृतीकार्यक्रम निर्मिती केली जावू शकते.

(Gharghani, Babak Nassiri, Comparative study of homework dimensions with emphasis on positive and negative effects on students learning between Iran and India, Ph.D., Edu.)

(LL Thurstone and B.J. Chave- The Measurement of Attitudes, Chicago University Press, 1929 P. 57-58)

7. व्याप्ती व मर्यादा :-

संशोधनाची व्याप्ती

अ) क्षेत्रव्याप्ती :- प्रस्तुत संशोधन लातूर जिल्हयापुरते व्यापक आहे.

आ) आशय व्याप्ती :- प्रस्तुत संशोधन हे उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांपुरते व्यापक आहे.

इ) घटक व्याप्ती :- प्रस्तुत संशोधन हे उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या गृहपाठाच्या अभ्यास करण्याइतके व्यापक आहे.

ई) कालव्याप्ती :- प्रस्तुत संशोधन 2022 ते 2025 या दरम्यान पुर्ण केले जाईल.

संशोधनाची मर्यादा :-

अ) क्षेत्रमर्यादा :- प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्हयापुरतेच मर्यादित आहे.

आ) आशय मर्यादा :- प्रस्तुत संशोधन हे इयत्ता सहावी विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

इ) घटक मर्यादा :- प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मराठी विषयाच्या गृहपाठाचा अभ्यास करण्यापुरते मर्यादित आहे.

सदर संशोधनाचे निष्कर्ष हे प्रतीसादकानी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून असतील.

परिमर्यादा :- प्रस्तुत संशोधन हे पुढील घटकांसाठी परीमर्यादित आहे.

अ. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे महाराष्ट्र राज्यातील रेणापूर तालुक्यातील उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित असतील.

ब. प्रस्तुत संशोधनात मराठी विषयाच्या गृहपाठाचा अभ्यास अपेक्षित असेल.

8. संशोधन परिकल्पना व शून्य परिकल्पना :-

संशोधन परिकल्पना

१. उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठीचा कार्यक्रम राबवल्यानंतर गृहपाठातील सहभागांमध्ये लक्षणीय परिणाम आढळतो.

शून्य परिकल्पना –

२. उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठीचा कार्यक्रम राबवल्यानंतर गृहपाठातील सहभागांमध्ये विशेष फरक पडत नाही.

9. संबंधित संशोधनाचा आढावा

9.1 **कदम व्ही.के.**, लातूर जिल्हया अंतर्गत येणा-या अद्यापक विद्यालयातील प्रशिक्षणाथ्र्यांच्या हिंदी भाषा क्षमतांचा विकास: एक चिकित्सक अभ्यास

उद्दिष्टये :- 1) अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणाथ्र्यांच्या श्रवण क्षमता विकासाचा शोध घेणे.

2) प्रशिक्षणाथ्र्यांच्या हिंदी भाषा क्षमता विकास विषयक हिंदी भाषा अध्यापकाच्या अभिवृत्तीचा शोधघेणे.

न्यादर्शात 1000 प्रशिक्षणाथ्र्यांचा समावेश होता

साधने :- चाचणी व अध्यापक अभिवृत्ती शोधीका तयार करण्यात आली

कार्यपध्दती :- संशोधन अभ्यासाकरीता सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला.

निष्कर्ष :- श्रवण क्षमता विकासासाठी हिंदी साहित्यकांच्या जयंतीचे आयोजन व विविध कार्यक्रम विषयक अभिवृत्ती चांगली आढळून आली.

9.2 **महेश्वर कळवावे**, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा शिक्षणशास्त्र शाखेत प्रवेशा च्या दृष्टीने असणाऱ्या शिक्षक अभिवृत्ती : एक अभ्यास,पि.एचडी. (शिक्षणशास्त्र) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, 2012

उद्दिष्ट :– महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शिक्षणशास्त्र शाखेकडे असणाऱ्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे.

संशोधन परिकल्पना :– सर्व शाखेतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा शिक्षणशास्त्र शाळेकडे अधिक कल आहे.

निष्कर्ष:–

1. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शिक्षणशास्त्र शाखे संबंधीची प्रवेशाच्या दृष्टीने असणाऱ्या अभिवृत्तीचे माध्यमान 157.07 एवढे आहे, यावरून असा निष्कर्ष निघतो की अभिवृत्ती चांगली आहे.
2. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणशास्त्र शाखे संबंधित अभिवृत्तीत फरक नसून ती जवळपास सारखीच आहे.
3. मुले व मुली यांची शिक्षणशास्त्र शाखे संबंधीच्या अभिवृत्तीत सार्थ फरक असून मुलींची अभिवृत्ती मुलांच्या अभिवृत्ती पेक्षा अधिक आहे.

10.संशोधन पद्धती :–

प्रस्तुत संशोधनात 'उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील मराठी विषय गृहपाठातील सहभागाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे' या उद्दिष्टासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीमधील सर्वेक्षण पद्धती या संशोधन पध्दतीचा वापर संशोधक करेल, विद्ध्यार्थ्यांची अभिवृत्तीचा अभ्यास केला जाईल. त्यानंतर प्रायोगिक संशोधन पध्दती वापराली जाईल. ज्यामध्ये उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी कृतीकार्यक्रमासाठीच्या आवश्यक घटकांची माहिती मिळेल, गृहपाठातील सहभाग वृद्धिंगत करण्यासाठी आवश्यक प्रयोगाचा कृतीकार्यक्रम तयार

करून अभिकल्प ठरवणे, पूर्व चाचणी घेणे प्रयोग राबविणे व अंतिम चाचणीच्या माध्यमातून परिकल्पनांची उकल व निष्कर्ष काढल्यानंतर अहवाल लेखन केले जाईल.

11. जनसंख्या :-

प्रस्तुत संशोधनासाठी जनसंख्या म्हणून महाराष्ट राज्यातील उच्च प्राथमिक स्तरात शिकणारे इयत्ता सहावीचे विद्यार्थी असतील.

12. नमुना :-

सर्वेक्षणासाठी लातूर जिल्ह्यात उच्च प्राथमिक स्तरावरील शाळांमधून सुगम यादृच्छिक निवड पद्धतीने (इयत्ता सहावीचे) 1000 विद्यार्थी नमुना म्हणून निवड करणार आहे. तर प्रयोगासाठी रेणापूर तालुक्यातील उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.

13. माहिती संकलनाची व विश्लेषणाची साधने :-

उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या मराठी विषय गृहपाठाबाबतची अभिवृत्ती अभासण्यासाठी लिकर्ट तंत्रानुसार अभिवृत्ती मापिका तयार केली जाईल, तसेच पूर्व चाचणी व उत्तर चाचणी तयार केली जाईल. मध्यमान, मध्यांक, बहुलक, प्रमाण विचलन, क्रांतिक अंक इ. साधनांचा उपयोग करण्यात येईल.

14. प्रकरण योजना :-

१. प्रस्तावना

२. संबधित संशोधनाचा आढावा

३. संशोधन पद्धती

४. माहितीचे अर्थनिर्वचन

५. सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

15. कालावधी :-

अ.क्र	संशोधन कार्य	कालावधी
१.	पूर्व संशोधनाचा आढावा	जुलै-२१ ते डिसेंबर-२१
२.	संशोधन विषय निश्चिती	जानेवारी-२२ ते जून-२२
३.	साधन विकसन	जुलै-२२ ते डिसेंबर -२३
४.	माहितीचे अर्थ निर्वचन	जानेवारी-२४ ते जून-२४
५.	अहवाल लेखन व सादरीकरण	जुलै-२४ ते डिसेंबर- २४

16. संदर्भग्रंथ सुची :-

- अरविंद दुनाखे ,(2006), प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, कोल्हापूर
- अनिता पाटील, (2008), मानसशास्त्रीय चाचण्या, डायमंड प्रकाशन, पुणे

- कुंडले. म. बा. (1990), शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, विद्या प्रकाशन.
- नीलिमा सप्रे, पाटील प्रीती, (2006) शिक्षणातील विचारप्रवाह, नित्य नूतन प्रकाशन, कोल्हापूर
- भिंताडे, वि. रा. (१९९९), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाशन.
- मुळे, उमाठे (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ.
- जगताप ह. ना.,(2008), शिक्षणातील नवप्रवाह व प्रवर्तने, नुतन प्रकाशन, पुणे.
- Ann C. Barbour, (2012), Learnings at home PreK -3, Skyhorse Publication, Canada
- Anderson, Donald Dunuoody. (1966): A Comparison of Edward's Personal Preferences Schedule Patterns of Elementary School Teachers in Open and Closed Organizational Climates. Auburn University.
- Best, J.W. and Kahan J.V. (1998), Research in Education (7 th edition)
- Corporate Social and
- Choudhary, C.M. (1991): "Research Methodology", New Delhi, RBSA Publishers.
- Dale H. Schunk, (2013), **Learning Theories: An Educational Perspective : Pearson New International Edition,**Pearson Education,North Carolina, Greensbro
- George, Allen & Linwon, Olurir. (1960): "Research in Education", London: Mac Millan Co.
- Kothari, C.R. (2003): "Research Methodology", New Delhi, Wishwa Prakashan.
- Michal Mason, (2005),The New Accountability, Routledge Publication
- Pandya, Shefali(2012), Research Methodology , New Delhi : APH Publishing Corporation.
- Sidhu, Kulbir Singh. (1984): "Methodology of Research in Education", New Delhi: Sterling Publishers Private limited.

संशोधक

पलमटे तुकाराम शिवदास

मार्गदर्शक

डॉ. सिध्दार्थ सुधाकरराव होवाळ

सहाय्यक प्राध्यापक,

डॉ.एस एस एम प्रतिष्ठानचे

अध्यापक महाविद्यालय, अहमदपूर